**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान)**

**शासन पुरकपत्र क्र. मातंसं २०१२/प्र.क्र.२७७/३९**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : ०८ जानेवारी, २०१८

<u>वाचा</u> :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, मातंसं २०१२/प्र.क्र.२७७/३९, दि. ४ फेब्रुवारी, २०१३

<u>प्रस्तावना :-</u>

या विभागाकडून संगणक अर्हतेबाबत वेळोवेळी शासन निर्णय पारीत करण्यात आले असून सदर अर्हतेसाठी ग्राहय धरण्यात येणा-या अभ्यासक्रमा संदर्भातील अद्ययावत तरतुदी संदर्भाकित दि.४.२.२०१३ च्या शासन निर्णयामध्ये विहित केल्या आहेत. सदर शासन निर्णयामध्ये महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या तसेच शासनमान्य विद्यापीठातील संगणक अभियांत्रिकी परीक्षा उत्तीर्ण केलेल्या उमेदवारांना संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल अशी तरतूद केली आहे. तथापि, सर्व अभियांत्रिकी शाखांचा अभ्यासक्रम *संगणक अर्हतेसाठी ग्राहय धरलेला नव्हता.* अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली मार्फत मान्यताप्राप्त सर्व अभियांत्रिकी पदवी व पदविका अभ्यासक्रमांमध्ये MSCIT संगणक अभ्यासक्रमाशी निगडीत विषय प्रथम वर्षामध्ये अभ्यासण्यात येतो. त्यामुळे सदर अभ्यासक्रम देखील संगणक अर्हतेसाठी ग्राह्य धरण्यास पात्र आहे. त्याचप्रमाणे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली मार्फत मान्यताप्राप्त सर्व पदवी व पदविका (सर्व अभियांत्रिकी शाखा) प्राप्त उमेदवारास MSCIT संगणक प्रशिक्षणातून सूट देण्याची तसेच शालेय अभ्यासक्रमामधील राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालेय अभ्यासक्रमाच्या इयत्ता ९ वी, १० वी, ११ वी व इयत्ता १२ वी साठी विहित विषय अभ्यासून उत्तीर्ण तसेच केंद्रीय माध्यमिक शालेय शिक्षण मंडळाची इयत्ता १० वी व १२ वी ची परीक्षा, संगणक/ माहिती तंत्रज्ञान हे विषय घेऊन उत्तीर्ण असल्यास संगणक अर्हता ग्राहय धरण्यात येत होती. तथापि, दोन्ही शिक्षण मंडळांच्या ग्राहय अभ्यासक्रमामध्ये समानता नव्हती तसेच इंडियन सर्टिफिकेट ऑफ स्कूल एज्युकेशन (ICSC) मंडळाच्या अभ्यासक्रमाचा यामध्ये समावेश नव्हता. उक्त सर्व बाबींच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील तंत्र शिक्षण संचालनालयाने श्री.यु.व्ही.कोकाटे, विभाग प्रमुख, संगणक, शासकीय तंत्रनिकेतन, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली. सदर समितीने केलेल्या शिफारशी मान्य करुन त्यानुसार उक्त शासन निर्णयात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन पुरकपत्र -</u>**

शासन निर्णय क्रमांक क्र.मातंस २०१२/प्र.क्र.२७७/का.३९ दि.४.२.२०१३ मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :-

| शासन निर्णय दि.४.२.२०१३ मधील परि.क्र. | मूळ तरतूद | प्रस्तावित पूरक पत्रातील परि.क्र. | सुधारित तरतूद/ नव्याने समाविष्ट करावयाची तरतूद |
|---|---|---|---|
| १.२ | "राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालेय अभ्यासक्रमाच्या इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी साठी माहिती तंत्रज्ञान विषय अभ्यासणाऱ्या विद्यार्थ्यांना व इ.११ वी व इ.१२ वी साठी माहिती तंत्रज्ञान, संगणक शास्त्र, कॉम्प्युटर टेक्निक व मल्टीमिडिया अँड इंटरनेट टेक्नॉलॉजी हे विषय अभ्यासून उत्तीर्ण". | १.२ | **महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण** |
| - | -- | १.६ | **अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) मार्फत मान्यताप्राप्त सर्व पदवी व पदवीका (सर्व अभियांत्रिकी शाखा) प्राप्त उमेदवार** |
| -- | -- | १.७ | **इंडियन सर्टिफिकेट ऑफ स्कूल एज्युकेशन (ICSC) यांच्या मार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण** |

सदरहु पुरक पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र. १/तांशि-२/२०१७, दि. १.४.२०१७ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन पुरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेताक २०१८०१०८१२४२०९१२११ असा आहे. हे पुरकपत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Hemant G Mhapankar

Digitally signed by Hemant G Mhapankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=DIT (GAD), postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1775f5c28a439e88c4c15ab3f88d6a6beb26ad2675a8c7a7ff397b2e5305303d, cn=Hemant G Mhapankar
Date: 2018.01.08 13:57:15 +05'30'

**( हे. गो. म्हापणकर )**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. सर्व मा. मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
५. सर्व अपर मुख्य सचिव/सर्व प्रधान सचिव/विशेष सचिव/सचिव,
६. प्रधान सचिव , महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन , मुंबई
७. *प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ शाखा),मुंबई,
८. *प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा),मुंबई,
९. *प्रबंधक, लोक आयुक्त/उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१०. *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
११. महालेखापाल १/२ लेखा व अनुज्ञेयता महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१२. महालेखापाल १/२ लेखा व परिक्षा महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१३. सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
१४. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य,
१५. सर्व महानगरपालिका आयुक्त
१६. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१७. सर्व उप मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषदा
    सर्व मंत्रालयीन विभाग,मंत्रालय,मुंबई
    सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख
१८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य,
१९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२१. निवड नस्ती (का.३९)

*पत्राने